भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक ०९.१२.२०२० ते १३.१२.२०२०)

| अंक ९७/२०२० | | | | | | | दिनांक ०८.१२.२०२० | | कालावधी ५ दिवस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०१/१२/२०२० ते ०७/१२/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामानाचे घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता ०९/१२/२०२० ते १३/१२/२०२० पर्यंत) | | | | |
| ०१/१२ | ०२/१२ | ०३/१२ | ०४/१२ | ०५/१२ | ०६/१२ | ०७/१२ | दिनांक | | ०९/१२ | १०/१२ | ११/१२ | १२/१२ | १३/१२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | | ३ | ६ | २ | ० | ० |
| ३६.० | ३५.० | ३६.० | ३५.५ | ३५.५ | ३५.५ | ३६.० | कमाल तापमान (अं. से) | | ३१ | ३५ | ३४ | ३२ | ३६ |
| २०.० | १९.५ | १७.० | १७.५ | १७.० | १६.० | १६.० | किमान तापमान (अं. से) | | २४ | २४ | २४ | २३ | २४ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ७ | ८ | ४ | १ | १ |
| ढगाळ | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | दुपार | | | | | | |
| ९१ | ९३ | ९२ | ९१ | ९१ | ८९ | ९१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | | ७८ | ८० | ८८ | ८१ | ८४ |
| ५६ | ४४ | ५५ | ४२ | ४२ | ४५ | ४२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ४५ | ५० | ४७ | ४२ | ४० |
| २.१ | ०.५ | ०.९ | १.० | १.० | ०.९ | ०.९ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ००७ | ००६ | ००६ | ००५ | ००४ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | पुर्वे कडे | पुर्वे कडे | पुर्वे कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे |
| पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वे कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पुर्वोत्तर/ आग्नेय कडे | पुर्वोत्तर/ आग्नेय कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ४८४०.४ | ४८३७.२ | ०.० |

| | |
|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती | सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक ०९ ते १३ डिसेंबर, २०२० या कालावधी दरम्यान दिनांक ९ ते ११ डिसेंबर दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. तसेच १२ व १३ डिसेंबर रोजी पर्जन्यमान कोरडे राहण्याची शक्यता आहे त्याचबरोबर तापमानात वाढ होऊन हवामान कोरडे व मुख्यत्वे ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून वर्तविण्यात आला आहे. |
| इशारा | सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पुढील पाच दिवसासाठी प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून पर्जन्यासंबधी कोणताही ईशारा देण्यात आलेला नाही. |
| सर्वसाधारण कृषि सल्ला | तापमानात होणारी वाढ व आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता भुईमुगाची पेरणी केल्यानंतर ३ दिवसांनी हलके पाणी द्यावे व त्यानंतर १० ते १२ दिवसाच्या अंतराने पिकाला पाणी द्यावे. तसेच सुर्यफुल व मोहोरी पिकाला वेळेवर पाणी द्यावे.<br>तापमानात होणारी वाढ व आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता येत्या ५ दिवसात बाष्पीभवनाचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने नारळ व सुपारी बागेस ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>फळभाज्या पिकांमध्ये रस शोषक किडींच्या व्यवस्थापनासाठी पिवळ्या कागदाचे चिकट सापळे लावावेत. |
| संक्षिप्त संदेश सल्ला | दिनांक ९ ते ११ डिसेंबर दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | पिक निहाय कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | नवीन पालवी | जिल्हयात आंबा बागांना मोठया प्रमाणावर पालवी आली आहे. ढगाळ वातावरण असल्यास मोठया प्रमाणावर तुडतुडयांची पैदास होते. त्यातच मोठया प्रमाणावर कोवळी पालवी तुडतुडयांना उपलब्ध झाल्यामुळे पालवीवर मोठया प्रमाणावर तुडतुडयांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. तुडतुडयांचा वेळीच बंदोबस्त करण्यासाठी त्वरीत किटकनाशकांची फवारणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी 2.8 टक्के तिव्रतेच्या डेल्टामेथ्रिन या किटकनाशकाची 9 मि.लि. प्रति 10 लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. ही पहिली फवारणी अगोदर झालेली असल्यास त्वरीत दुसरी फवारणी करावी. त्यासाठी 5 टक्के तिव्रतेचे लॅम्ब्डा सायहॅलोथ्रिन (10 लिटर पाण्यात 6 मि. ली.) हे किटकनाशक वापरावे.<br>येत्या ५ दिवसामध्ये तापमान वाढ संभवत असल्यामुळे नवीन आंबा लागवडीमध्ये कलमांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडनेटच्या सहाय्याने आच्छादन करावे.<br>मोठया आंबा बागेमध्ये वाढलेले झाडे झुडपे व तण काढून बागेची स्वच्छता करून घ्यावी.<br>पुढील ५ दिवसांमध्ये ढगाळ वातावरण व हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता आंबा पालवीवर तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशी यापासून आवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५% प्रवाही डायमिथोएट किंवा ३६% प्रवाही मोनोक्रोटोफॉस ११ मिलि प्रति १० लि पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| काजु | नवीन पालवी ते फुलोरा | येत्या ५ दिवसात सापेक्ष आद्रतेमध्ये घट होउन कोरडे हवामान व वाढणा-या तापमानाची शक्यता लक्षात घेता नवीन लागवड केलेल्या कलमांच्या बुंधा स्वच्छ करून बुंध्यालगतची जागा खणून घ्यावी तसेच पाणी देण्याकरीता गोलाकार आळे तयार करून वाळलेल्या गवताचे आच्छादन द्यावे. नवीन काजु लागवडीमध्ये कलमांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडनेटचे आच्छादन करावे.<br>मोठया काजू बागेमध्ये वाढलेले झाडे झुडपे व तण काढून बागेची स्वच्छता करून घ्यावी.<br>पुढील ५ दिवसांमध्ये ढगाळ वातावरण व हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता काजुतील मोहोराचे ढेकण्या व फुलकिडीपासुन संरक्षण करणे गरजेचे आहे. प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि.ली. किंवा लम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ६ मि.ली. किंवा प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही/१० मि.ली. प्रति १० लि. पाण्यातून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | काजूचे उत्पन्न वाढविण्यासाठी स्वस्त अशा सुकलेल्या माश्यांचा अर्क ५०० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यातून पहिली फवारणी फुलो-याच्यावेळी तर दसुरी फवरणी पहिल्या फवारणी नंतर १५ दिवसांनी करावी.<br>काजु बियांचे उत्पादन वाढविण्यासाठी १० पी पी एम या संजीवकाची दुसरी फवारणी मोहोर येताना करावी.<br>काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| नारळ | फळधारणा | तापमानात होणारी वाढ व आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता येत्या ५ दिवसात बाष्पीभवनाचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने नारळ बागेस ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| सुपारी | फळधारणा | तापमानात होणारी वाढ व आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता येत्या ५ दिवसात बाष्पीभवनाचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने सुपारी बागेस ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| वायंगणी भात | रब्बी पेरणी | रब्बी हंगावातील भात लागवडीच्या पुर्व तयारीस सुरुवात करावी. उन्हाळी भात पीकासाठी १ हेक्टर क्षेत्र लागवडीसाठी १० गुंठे क्षेत्रात गादीवाफे तयार करुन घ्यावेत. जमिनीचा उतार लक्षात घेऊन निच-याच्या जागी तळाशी १२० सेमी आणि प्रुष्ठभागाशी ९० सेमी रुंदीचे ८ ते १० सेमी उंचीचे योग्य त्या लांबीचे गादी वाफे तयार करावेत. वाफ्यात प्रती गुंठा क्षेत्रास १ किलो युरिया व १.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट द्यावे. बियाण्यास ३% मिठाच्या द्रावणाची (३०० ग्रम मीठ/१० लि. पाणी) प्रक्रिया करावी. वाफ्यावर ५ ते ८ से.मी. अंतरावर ओळीमध्ये १ ते २ सेमी खोलीवर बी पेरुन घ्यावे. जाड दाण्यांच्या जातीसाठी ५० किलो तर बारीक दाण्यांच्या जातीसाठी ४० किलो बियाणे वापरावे. वायंगणी भात पीकाची पेरणी सुधारीत बियाण्यांचा वापर करुन करावी. |
| भुईमुग | रब्बी पेरणी | तापमानात होणारी वाढ व आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता भुईमुगाची पेरणी केल्यानंतर ३ दिवसांनी हलके पाणी द्यावे व त्यानंतर १० ते १२ दिवसाच्या अंतराने पिकाला पाणी द्यावे. |
| कुळीथ | रोप अवस्था | पुढील ५ दिवसांमध्ये ढगाळ वातावरण व हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता कुळीथ पिकात रस शोषणा-या किडी आढळल्यास मोनोक्रोटोफॉस प्रति लिटर पाण्यात १.२ मिली या प्रमाणात मिसळुन फवारणी करावी.<br>पेरणीस १५ दिवस झाले असल्यास पिकास १ वेळ बेणणी व कुळपणी द्यावी त्यानंतर पिकाची वाढ दाट झाल्यामुळे तणांच्या वाढीस आळा बसतो. |
| चवळी | रोप अवस्था | पेरणीस १५ दिवस झाले असल्यास पिकास १५ आणि ३० दिवसांनी निंदणी करुन पिक तणमुक्त ठेवावे.<br>येत्या ५ दिवसात सापेक्ष आद्रतेमध्ये घट होउन कोरडे हवामान व वाढणा-या तापमानाची शक्यता लक्षात घेता चवळी पिकाला ८ ते ९ दिवसांच्या अंतराने पाण्याच्या ५ ते ६ पाळ्या द्याव्यात |
| कडवा वाल | रोप अवस्था | पेरणीस १५ दिवस झाले असल्यास पिकास १ वेळ बेणणी व कुळपणी द्यावी त्यानंतर पिकाची वाढ दाट झाल्यामुळे तणांच्या वाढीस आळा बसतो.<br>पुढील ५ दिवसांमध्ये ढगाळ वातावरण व हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता कडवा वाल पिकात रस शोषणा-या किडी आढळल्यास मोनोक्रोटोफॉस प्रति लिटर पाण्यात १.२ मिली या प्रमाणात मिसळुन फवारणी करावी. |
| दुभती जनावरे, शेळया, कुक्कुटपालन | | जनावरांचे व पक्ष्यांचे दुपारच्या उष्णतेपासून व रात्रीच्या थंडीपासुन योग्य ते संरक्षण करावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| | |
|---|---|
| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ओफिसर<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ |